राज्यात इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी "मोदी आवास" घरकुल योजना राबविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- वगृयो-२०२३/प्र.क्र.३३/योजना-५**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ सप्टेंबर, २०२३.

**वाचा :** १) इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र.वगृयो-२०२३/प्र.क्र.३३/योजना५, दि.२८.०७.२०२३

**प्रस्तावना :-**

सन २०२३-२४ च्या अर्थ संकल्पीय भाषणामध्ये मा. उप मुख्यमंत्री (वित्त) महोदयांनी दि.०९ मार्च,२०२३ रोजी राज्याचा सन २०२३-२४ करीताचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना " इतर मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी येत्या तीन वर्षात १० लाख घरे बांधण्यासाठी नवीन "मोदी आवास" घरकुल योजना सुरु करण्यात येईल. या योजनेसाठी येत्या ३ वर्षात १२ हजार कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येतील. यापैकी ३ लाख घरे ३ हजार ६०० कोटी रुपये खर्च करुन सन २०२३-२४ या पहिल्या वर्षात पुर्ण करण्यात येतील अशी घोषणा केली होती. त्याअनुषंगाने इतर मागास प्रवर्गातील लाभार्थ्यासाठी येत्या तीन वर्षात १० लाख घरे बांधण्यासाठी "मोदी आवास" घरकुल योजना राबविण्याबाबतच्या प्रस्तावास दि.२१.०७.२०२३ रोजी मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन निर्णय इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्र.वगृयो-२०२३/प्र.क्र.३३/योजना-५, दि.२८.०७.२०२३ निर्गमित करण्यात आला आहे.

तथापि, विशेष मागास प्रवर्गासाठी सुद्धा यापूर्वी सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये मा.वित्त मंत्री महोदयांनी घरकुले प्रस्तावित केली होती. त्यामुळे सदर प्रवर्गासही घरकुले आवश्यक आहेत. त्याअनुषंगाने विशेष मागास प्रवर्गातील घरकुलास पात्र कुटूंबांचा समावेश "मोदी आवास" घरकुल योजनेमध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यात ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास प्रवर्गासोबत विशेष मागास प्रवर्गातील घरकुलास पात्र कुटूंबांचा समावेश "मोदी आवास" घरकुल योजनेमध्ये करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

०२. शासन निर्णय इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्र.वगृयो-२०२३/प्र.क्र.३३/योजना-५, दि.२८.०७.२०२३ मधील नमुद अटी व शर्ती विशेष मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांनाही लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०९२७१५२८१४६१३४असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NARENDRA WAMAN AHER

Digitally signed by NARENDRA WAMAN AHER
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OTHER BACKWARD AND BAHUJAN WELFARE DEPARTMENT, 2.5.4.20=93ab34830c74c1bdd18aba78607581bb0e2e31858d9e191999dca16966984dbb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6658A056228A0827243EBC94F7B8895CCED1C1604820C730DA4512E19C8AEF26, cn=NARENDRA WAMAN AHER
Date: 2023.09.27 15:30:50 +05'30'

**( नरेंद्र आहेर )**
**अवर सचिव महाराष्ट्र शासन**

**प्रतः-**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव.
३. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव.
५. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव.
६. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
७. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/ विधान परिषद यांचे खाजगी सचिव.
८. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
९. सर्व मा. पालकमंत्री यांचे खाजगी सचिव.
१०. मा. मुख्य सचिव यांचे सह/उप सचिव.
११. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
१३. सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, यांचे स्वीय सहायक.
१४. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. आदिवासी विकास आयुक्त, नाशिक.
१६. समाज कल्याण आयुक्त, पुणे.
१७. संचालक (इतर मागास बहुजन कल्याण संचनालय),पुणे
१८. कामगार आयुक्त, मुंबई.
१९. सर्व विभागीय आयुक्त.
२०. सर्व जिल्हाधिकारी.
२१. सर्व कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२२. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय.
२३. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय.
२४. कार्यासन अधिकारी, योजना- १०, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई.
२५. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती.
२६. सर्व सरपंच, ग्रामपंचायत.
२७. निवड नस्ती(योजना-५)